**मूळ वेतनाच्या ५०% एवढा महागाईभत्ता मूळ वेतनात विलीन करण्याबाबत...**

स्पष्टीकरण

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग

शासन परीपत्रक,वित्त विभाग,क्रमांक:संकीर्ण-१००४/प्र.क्र.४४/सेवा -५

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक: १४ जानेवारी,२००५

पहा:- (१) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक:मभवा-११०४/प्र.क्र.५/सेवा-९, दिनांक:१९ जुलै,२००४.

(२) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक:वाहभ-१०९८/प्र.क्र.८३/९८/ सेवा-५,दिनांक:१४ डिसेंबर,१९९८.

(३) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक:घभाव-२०००/प्र.क्र.९७/२०००/ सेवा-५,दिनांक:१७ फेब्रुवारी,२००१.

**परीपत्रक**

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांचा, त्यांच्या मूळ वेतनावर देय असणाऱ्या एकूण महागाई भत्त्यापैकी मूळ वेतनाच्या ५०% एवढा महागाईभत्ता, त्यांच्या मूळ वेतनामध्ये विलीन करण्याविषयीचे आदेश वरील (१) येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. काही विवक्षित बाबींसंदर्भात त्या आदेशांतील तरतूदींची अंमलबजावणी कशा रीतीने करावी याबाबत शासनाकडे विचारणा करण्यात येत होती.

२. शासन यासंदर्भात आता खालीलप्रमाणे खुलासा करीत आहे :

| मुद्दे | स्पष्टीकरण |
| --- | --- |
| (१) मूळ वेतनामध्ये महागाई भत्त्याचे विलीनीकरण करण्याविषयीच्या वरील आदेशानंतर शासकीय निवासस्थानासाठी अनुज्ञप्ती शुल्काची वसूली कशी करावी? | वरील (३) येथील आदेशातील तरतूदीनुसार पूर्वीप्रमाणेच कर्मचा-याच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या निवासस्थानाच्या प्रकारानुसार अनुज्ञप्ति शुल्काची वसूली करण्यात यावी. |
| (२) वरील आदेशानंतर शासकीय निवासस्थानासाठी आकारण्यात येणा-या सेवाशुल्क माफीच्या प्रयोजनार्थ वित्तलब्धीची रक्कम परिगणित करतांना मूळ वेतनात महागाई भत्त्याचे विलीनीकरण करावयाचे आहे का? | नाही. या प्रयोजनार्थ महागाई भत्त्याचे मूळ वेतनात विलीनीकरण करावयाचे नसल्याने सेवा शुल्क माफीच्या प्रयोजनार्थ वित्तलब्धीची मर्यादा पूर्वीप्रमाणे रु.४३८०/- इतकीच असेल. |

रोटा/एच-846(12000+50-01-2005)-1

| | |
|---|---|
| (३) वरील आदेशानंतर व्यवसायरोध भत्त्याची परिगणना कशी करावी? मूळ वेतन आणि व्यवसायरोध भत्ता यांच्या बेरजेवरील रु.२९,५००/- ची मर्यादा तपासतांना मूळ वेतनात महागाई भत्त्याचे विलीनीकरण करावयाचे आहे किंवा कसे? | व्यवसायरोध भत्त्याच्या परिगणनेच्या प्रयोजनार्थ मूळ वेतनात महागाई भत्त्याचे केलेले विलीनीकरण विचारात घ्यावयाचे आहे. म्हणजे मूळ वेतन आणि महागाई वेतन यांच्या बेरजेवर व्यवसायरोध भत्त्याची परिगणना करावयाची आहे. मात्र, व्यवसायरोध भत्त्याच्या कमाल रकमेच्या अनुज्ञेयतेसंदर्भात घालण्यात आलेली मूळ वेतन आणि व्यवसायरोध भत्ता यांच्या बेरजेवरील रु.२९,५००/- ची मर्यादा तपासतांना मूळ वेतनात महागाई वेतनाचा समावेश करण्यात येऊ नये. |
| (४) वरील आदेशानंतर वाहतूक भत्त्याचे प्रदान करताना मूळ वेतनात महागाई भत्त्याचे झालेले विलीनीकरण कसे विचारात घ्यावे? | वरील (२) येथील आदेशान्वये कर्मचा-यांना त्यांच्या वेतनाऐवजी वेतनश्रेणी लक्षात घेऊन वाहतूक भत्ता मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे वाहतूक भत्ता मंजूर करतांना मूळ वेतनात महागाई भत्त्याचे विलिनीकरण विचारात घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शु. श. कारेकर**
**शासनाच्या उप सचिव.**

**प्रति,**

प्रधान महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व विभागीय आयुक्त
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
#प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा) मुंबई
#प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपिल शाखा) मुंबई.
सर्व समाजकल्याण अधिकारी, वर्ग-१
सर्व आदिवासी कल्याण अधिकारी.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प.
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी.
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
#सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
#प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
#सह संचालक, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ-गव्हर्नमेंट, मुंबई.
उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग,(२० प्रती)
शालेय शिक्षण विभाग,(२० प्रती)
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,(२० प्रती)
नगर विकास विभाग, यु.डी-१०(२० प्रती)
कृषि व पदुम विभाग (२० प्रती)
सहकार व वस्त्रोद्योग विभाग (२० प्रती)
आदिवासी विकास विभाग (२० प्रती)
सिनिअर रिसर्च ऑफिसर,पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग) खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई.
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक(प्रत्येकी १० प्रती)
प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगर-पालिकांची शिक्षण मंडळे यांसह)
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक (१० प्रती)
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
संचालक, आदिवासी संशोधन व शिक्षण संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे.
आदिवासी विकास आयुक्त, नाशिक
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
अप्पर आयुक्त, आदिवासी उपयोजना, नाशिक/ नागपूर.
# पत्राद्वारे
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती.
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
अधिक्षक, वेतन पथक, सर्व जिल्हे.
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर/दक्षिण व पशिम विभाग)
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे (२५ प्रती)
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती)
संचालक, तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई (१०० प्रती)
संचालक, तांत्रिक प्रशिक्षण, द्वारा-तंत्रशिक्षण संचालक, मुंबई (२५० प्रती)
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व विभागीय तंत्रशिक्षण उपसंचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी.
आयुक्त महानगरपालिका, नागपूर.
प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगर पालिकांच्या शिक्षण मंडळांसह)
कार्यकारी, अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/ देवळाली/अहमदनगर.
सर्व कन्या शाळा निरीक्षिका
सर्व जिल्ह्यांचे वरीष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका
संचालक, नगरपालिका प्रशासन,मुंबई
सर्व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
निवडनस्ती, वित्त विभाग (सेवा-५)

-------